सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)

## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

Web : www.dirhe.org

E-mail : Info@dirhe.org.in

☐(०२०) २६१२२१११, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३

क्र.उशिस.मतनिस/धर्माधिकारी समिती/प्रशा-१ २९६८ दिनांक-५.६.२०१३

5 JUN 2013

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण

कुलसचिव सर्व अकृषी विद्यापीठे

सर्व प्राचार्य /संचालक शासकीय संस्था/महाविद्यालये

विषय -न्यायमुर्ती.धर्माधिकारी समितीचा तृतीय अंतरीम अहवाल.व मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपिल क्र.८५१३/१२वर दिनांक ३०.११.२०१२ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगानेमहिलांवरील लैंगिक आत्याचार रोखण्यासाठी शैक्षणीक संस्था/महाविद्यालये यांनी कार्यवाही करुन पुर्तता अहवाल सादर करणेबाबत.

संदर्भ- शासन पत्र क्र.इएसटी -२०१३/प्र.क्र.७१/१३/आस्था-१ दिनांक ३०.मे.२०१३.

उपरोक्त विषयी संदर्भीय शासन पत्र तथा सर्वोच्च न्यायालयाने विषयांकीत प्रकरणी दिलेल्या अपिल क्र ८५१३/१२ मधील परिछेद क्र.३२ मधील मुद्दा क्र .३ व ६ चे अवलोक न करावे सोबत (सोबत प्रत पाठविण्यात येत आहे ) सदर निकालाच्या अनुषंगाने न्या.धर्माधिकारी समितीने सदर समितीच्या तृतीय अंतरिम अहवालातील या विभागातील संबधित बाबीवर शासनास सुचवेलल्या मुद्दा क्र.१३.व २० बाबत तात्काळ कार्यवाही करावी व याबाबतचा अहवाल त्वरीत संचालनालयास सादर करण्यात यावा.

सदर समितीने शासनास खालील मुद्दयांच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत शिफारस केलेली आहे.

(१)मुद्दा क्र. १३. नुसार राज्यातील प्रत्येक शैक्षणिक संस्थेत तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याबाबत सुचना दिलेली आहे.याकरीता ,प्रत्येक शैक्षणिक संस्थेत तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात यावा.

(२) मुद्दा क्र.२०. अन्वये मैदान नसलेल्या शिक्षण संस्थांना शासनाने अनुमती देऊ नये.अशी शिफारस करण्यात आलेली आहे. सदर मुद्याच्या अनुषंगाने धोरणात्मक निर्णय घेण्याच्या अनुषंगाने आपले सविस्तर आभिप्राय शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

३) सर्वोच्च न्यायालय सिव्हील अपिलेट नं.८५१३/२०१२ निणर्य दिनांक ३०.११.१२ परिछेद क्र.३२ मधील अ.क्र .३व ६ खालील प्रमाणे आहेत.

मुद्दा क्र.३ persons in change of the educational insituations place of worship,cinema theaters ,railway station ,bus stands have to take steps as they deen fit to prevent eve teasing ,within their precients and on a complaint being made they.

मुद्दाक्र.६ suitable bonds cautioning such at of eve –teasing be exhibited in all.public places including precints of educational instituations bus stands,railway station, cinema theaters, public service vechicles place of worship.etc.

11 2013

आवक क्रमांक

410.

R office

आपूर्तीचे प्रत ... BCUD ... Dir BCUD.

D 914 12/6/13

12/6/13

आपले क्षेत्रातील शैक्षणिक संस्थात याप्रमाणे बोर्ड लावणेची कार्यवाही करावी मुद्दा क्र .३ व ६ नुसार सर्व शैक्षणीक संस्थात बोर्ड लावणेसाठी प्रातिनिधीक बोर्डचा मजकुर कसा असावा याबाबत दुरध्वनीवरुन चर्चा करावी हे निश्चित करून ,सर्व प्राचार्यांना कळवुन याबाबतची अमलबजावणी त्वरीत करण्यात यावी.

महिलावरील लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी या पत्रात दिलेल्या निर्देशाचे अनुपालन करुन विषयांकीत प्रकरणी तातडीने कार्यवाही करुन सहकार्य करावे. शासकीय महाविद्यालये संस्था यांनी स्वताः व सहसंचालक यांनी अनुदानीत/विनआनुदानीत महाविद्यालाचा पुर्तता अहवाल व कुलसचिव विद्यापीठ यांचा कायम विनाअनुदानीत महाविद्यालयाचा व विद्यापीठातील परीसराचा पुर्तता अहवाल सहसंचालक यांनी प्राप्त करून घेऊन संचालनालयास सादर करण्यात यावा.

३/६/२०१३

**(डॉ.प्र.रा.गायकवाड)**
प्र.शिक्षण संचालक उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य,पुणे-१

सोबत -१.शासनाचे संदर्भीय पत्र १
२.न्या.चंद्रशेखर धर्माधिकारी समितीचा तृतीय अंतरिम अहवाल (पान क्र १ ते १२)
३. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील आपिल क्र.८५१३/२०१२दिनांक ३०.११.१२रोजी दिलेल्या निर्णयाची प्रत पाठविण्यात येत आहे. (पान क्र १,२ व १३,१४)

प्रत-मा.प्रधान सचिव उच्च व तंत्र शिक्षण विभाग विस्तार भवन मुंबई -३२ यांना माहीती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव सविनय सादर.

शिक्षण संचालनालय
(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.
-1 JUN 2013
आवक क्रमांक:-..............
शाखा:-..........................

(१)

महाराष्ट्र शासन

महत्वाचे/अतितात्काळ

क्र:-इएसटी-२०१३/प्र.क्र.७१/१३/आस्था-१
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक- ३० मे, २०१३

प्रति,
सर्व सहसचिव/उपसचिव,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.

विषय:- न्या.धर्माधिकारी समितीचा तृतीय अंतरीम अहवाल-
व मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपिल क्र.८५१३/१२ वर
दि.३०/११/२०१२ रोजी दिलेला निर्णय.

संदर्भ:- १) उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे समक्रमांकाचे दिनांक
२८ फेब्रूवारी, २०१३ रोजीचे पत्र व त्यासोबत त्यासोबत न्या.चंद्रशेखर
धर्माधिकारी समितीचा तृतीय अंतरिम रिपोर्ट
२) उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे पृष्ठांकन क्र. इएसटी-२०१२/सं.क्र.२१४९
/आस्था-१, दि. २७ जानेवारी, २०१३. व सोबत मा.सर्वोच्च न्यायालयाने
सि.अ.क्र.८५१३/२०१२ वर दि.३०/११/१२ रोजी दिलेला निर्णय.
३) गृह विभागाचे पत्र क्र.याचिका-१२१२/प्र.क्र.५५९/विशा-६,
दि.२८/५/२०१३

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भ क्र.१ व २ वरील पत्रांचे कृपया अवलोकन करावे.

उपरोक्त पत्रान्वये, न्या.धर्माधिकारी समितीचा तृतीय अंतरिम अहवालातील या विभागाशी संबंधित बाबींवर योग्य ती कार्यवाही करण्याच्या दृष्टीने सदर मुद्यांच्या अनुषंगाने आपले अभिप्राय मागविण्यात आले आहेत. तसेच .सिव्हील अपिल क्र. ८५१३/१२ वर दि. ३०/११/१२ रोजी दिलेल्या निर्णयानुसार आवश्यक कार्यवाही करुन सदरचे परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील कार्यालयांच्या निदर्शनास आणून सदर निर्णयातील परिच्छेद ३२ मधील मुद्दा क्र. ३ व ६ बाबत शैक्षणिक संस्थांनी विशेष कार्यवाही करुन कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

२. याबाबत, मा.न्या श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी समितीने शासनास सादर केलेल्या तीन अंतरिम अहवालातील शिफारशींवर केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्याकरीता दि. २९/५/२०१३ रोजी अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये दिलेल्या निदेशानुसार, महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी केलेल्या कार्यवाहीचा आढावा तात्काळ सादर करण्याबाबत

कळविण्यात आले असून, याबाबत दि.५/६/२०१३ रोजी पुनश्च बैठक आयोजित करण्यात येणार आहे. सदर बैठकीमध्ये विभागाचा अनुपालन अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

३. याकरीता, न्या.धर्माधिकारी समितीचा तृतीय अंतरिम अहवालातील संबंधित मुद्यांच्या अनुषंगाने (मुद्दा क्र. १३ व २० ) तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक आहे. (प्रत सोबत जोडली आहे)

(१). मुद्दा क्र. १३ नुसार, राज्यातील प्रत्येक शैक्षणिक संस्थेत तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याबाबत सूचना दिलेली आहे. याकरीता, प्रत्येक शैक्षणिक संस्थेत तक्रार निवारण कक्ष स्थापन झाल्याचे संबंधित संचालनालयाने खात्री करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

(२) मुद्दा क्र. २० अन्वये मैदान नसलेल्या शिक्षण संस्थांना शासनाने अनुमती देऊ नये अशी शिफारस करण्यात आली आहे. सदर मुद्याच्या अनुषंगाने धोरणात्मक निर्णय घेण्याच्या अनुषंगाने आपले सविस्तर अभिप्राय शासनास सादर करावेत.

तसेच, मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपिल क्र. ८५१३/२०१२ वर दि. ३०/११/२०१२ रोजी दिलेल्या निर्णयातील परिच्छेद क्र. ३२ मधील क्र. ३ व ६ च्या अनुषंगाने (प्रत सोबत जोडली आहे) सर्व शक्षणिक संस्थांनी विशेष कार्यवाही करण्याबाबत सूचना तात्काळ आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात.

४. महिलांवरील वाढता अत्याचार रोखण्याबाबत विभागाने केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने आढावा घेण्याकरीता दि. ५/६/२०१३ रोजी अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली पुन्हा बैठक आयोजित करण्यात येणार असल्यामुळे याबाबत तात्काळ कार्यवाही करुन आपला अनुपालन अहवाल शासनास दि. ५/६/२०१३ पूर्वी सादर करावा. सदर कार्यवाही न्यायालयीन प्रकरणाच्या अनुषंगाने करणे आवश्यक असल्याने यास प्राथम्य देऊन तात्काळ कार्यवाही करावी तसेच सदर बाब आपल्या अधिनस्त कार्यालयांच्या निदर्शनास आणावी. ही विनंती

(शैला तारगे-पाटील )
सहसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,
आयुक्त (व्यवसाय शिक्षण)
संचालक (उच्च शिक्षण/महाविद्यालयीन शिक्षण/व्यवसाय शिक्षण/कला)
कुलसचिव (सर्व अकृषि विद्यापीठे)

यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी प्रत्येक शैक्षणिक संस्थांमध्ये तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आल्याचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा. महिलांवरील अत्याचाराच्या केसेसची सुनावणी करणे तसेच शैक्षणिक संस्थांमध्ये महिलांचे लैंगिक शोषणास प्रतिबंधक करण्याबाबत आवश्यक असणारी सर्व कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित शैक्षणिक संस्थांना कराव्यात व सर्व शैक्षणिक संस्थांनी अशा प्रकारची कार्यवाही केली असल्याचा अनुपालन अहवाल प्राप्त करुन तो शासनास २ दिवसांत शासनास सादर करावा.

(2)

# महाराष्ट्र शासन

क्र:-इएसटी-२०१३/प्र.क्र.७१/१३/आस्था-१
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक- २८ फेब्रूवारी, २०१३

प्रति,
सर्व सहसचिव/उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे.
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.
संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई
संचालक, व्यवसाय प्रशिक्षण संचालनालय, मुंबई
संचालक, कला संचालनालय, मुंबई.
संचालक, ग्रंथालय संचालनालय, मुंबई.

विषय:- न्या.धर्माधिकारी समितीचवा तृतीय अंतरिम अहवाल.

संदर्भ:- गृह विभागाचे पत्र क्र.पीएडब्ल्यू-०११३/प्र.क्र.२५/विशा-६, दि. १४ फेब्रूवारी, २०१३.

उपरोक्त विषयाचे संदर्भाधीन पत्र सहपत्रांसह जोडून पाठविण्यात येत आहे.

संदर्भाधीन पत्रान्वये कळविल्यानुसार, न्या.धर्माधिकारी समितीचा तृतीय अंतरिम अहवालातील उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी संबंधित बाबींवर ( मुद्दा क्र. १३, २० ) योग्य ती कार्यवाही करण्याकरीता, सदर मुद्यांच्या अनुषंगाने आपले अभिप्राय असल्यास ते (मराठी व इंग्रजीत) त्वरीत सादर करण्यात यावेत, अशी विनंती आहे.

उर्मिला जोशी
(उर्मिला जोशी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

निर्गमित
दिनांक ६/३/१२

९१५


न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी

विद्यमान न्यायमूर्ति, उच्च न्यायालय
व मा. मंत्री यांचा दर्जा (महाराष्ट्र शासनाव्दारे प्रदान)
भारताचे मा. राष्ट्रपतिव्दारा पद्मभूषण
ॲवार्डने सन्मानित.
मानद डॉक्टर ऑफ लॉज्

Justice C.S. Dharmadhikari

Conferred Status of Sitting Judge, of High Court
& Hon'ble Minister (By Govt. of Maharashtra)
AWARDED "PADMA BHUSHAN" BY
PRESIDENT OF INDIA.
HON. DOCTOR OF LAWS.

(3)

८- ए समता,
जनरल ज. भोसले मार्ग मुंबई ४०० ०२१
फोन नं. २२०४ ४७१६ फॅक्स निवास : २२८३ ४८३२
कार्यालय फॅक्स : २२६७९६९७

8-A, SAMATA, General J. Bhosale Marg,
MUMBAI 400 021.
Tel.No. 2204 4716 Fax No. 22834832 ®
Fax No. 2267 9697 (O)
E-mail: csd1927@indiatimes.com


मुंबई
दिनांक : १७ जानेवारी २०१३

932
28/1/13

प्रति,
सुश्री. मेधा गाडगीळ,
प्रधान सचिव (अ. व. सु.)
गृहविभाग

यांसी, सस्नेह नमस्कार,

काल म्हणजे दि. १६ जाने २०१३ रोजी आयोजित महिलांवरील अत्याचार रोखण्यासंदर्भात स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या बैठकीत समितीचा तृतीय अंतरिम रिपोर्ट, सादर करण्यात आला व तो समितीने सर्वानुमताने मंजूर केला, त्यांत अनवधानाने काही चुका राहिल्या होत्या त्या सुधारून त्यांच्या प्रति पाठवीत आहे. सोबत सुश्री. शोभनाताई फडवणीस यांचे पत्रही पाठवीत आहे. या संबंधात संबंधित विभागांनी उचित कारवाई करावी, असे कळवावे लागेल, व तशी पाऊले उचलली जातील अशी खात्री आहे.

आपल्या सहयोगाबद्दल आभारी आहे. नूतनवर्षाच्या शुभेच्छासह

आपला सहृदयी
चंद्रशेखर धर्माधिकारी
(न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी)

संलग्न : सुधारीत तृतीय अंतरिम रिपोर्ट
२. सुश्री. शोभाताई फडणविस यांचे पत्र
३. कलम 292, 293 इन्डीयन पिनल कोड यास तामिलनाडूने सुचविलेल्या सुधारणा -

श्री. सोनवणे उप-सचिव गृहविभाग यांना माहितीसाठी व उचित कारवाईसाठी -

का/ 20/1/13
का. अ-( विशा-५
[illegible]
21/1

3/45

(4)

## समितीचा तृतिय अंतरिम रिपोर्ट

१) सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती ज्ञानसुधाजी व दिल्ली उच्च न्यायालयाच्या निवृत्त महिला न्यायमूर्ती सुश्री उषा मेहराजी यांनी अशी सूचना केली आहे की, बलात्कारास बळी पडलेल्या महिलेची जबानी एकदाच घेण्यात यावी. ती कलम १६४ क्रीमिनल प्रोसिजर कोडमध्ये नमूद केल्याप्रमाणे मॅजिस्ट्रेटने घ्यावी. व नंतर तीच जबानी सरतपासणी (Examination in chief) आहे असे केसच्या सुनावणीचे वेळी मानण्यात यावे व त्या आधारावर उलट तपासणी व्हावी. म्हणजे वेळोवेळी जबानी घेऊन पीडित महिलेस त्रास होणार नाही, या सूचनेचा विचार गांभीर्याने करणे अगत्याचे आहे, व तशी सुधारणा कायद्यात करण्यात यावी अशी शिफारस समिती करीत आहे.

२) Child (बालक) या शब्दाची व्याख्या वेगवेगळ्या कायद्यांत वेगवेगळी आहे. लग्नासाठी जर मुलीचे वय १८ नमूद केले आहे. तर बलात्कारासाठी असलेल्या कलम ३७५ I.P.C. मध्ये संमतीचे वय १६ आहे, अन्य कायद्यात बालकाचे वय १४ किंवा १५ वर्षे आहे. ही विसंगती दूर करावी लागेल. नुकतेच म्हणजे ४ डिसेंबर २०१२ रोजी लोकसभेत जे Criminal Law Amendment Bill 2012 सादर करण्यात आले आहे, त्यात बलात्कारा संबंधीच्या कलमात बदल सुचविला आहे व संमतीचे वय १८ असावे असे प्रस्तावित करण्यात आले आहे. परंतु अन्य कायद्यातही असा बदल करुन सर्वत्र समान वय असावयास हवे. तशी शिफारस केंद्र सरकारला करावी अशी समिती शिफारिस करीत आहे.

३) समाजाची व पुलिसांची मानसिकता बदलण्याची गरज आहे. कायद्याची प्रभावी आणि संवेदनशीलपणे अंमलबजावणी करण्याची गरज आहे. जे पुलिसकर्मी स्त्रियांच्या तक्रारीची योग्य व शीघ्र दखल घेत नाहीत त्यांच्या विरुध्द कठोर कारवाई करण्यात यावी व याबद्दल वरिष्ठांनाही जबाबदार धरले जावे. कारण ही संयुक्त जबाबदारी आहे. म्हणून तशी शिफारस समिती करीत आहे.

४) सरकारी वकीलांवर या केसबद्दल मीडियाशी बोलण्यावर बंधन घालावे लागेल. असे बंधन आरोपीच्या वकीलावरही असावे लागेल. यासाठी बार कौन्सीलने तरतूद करणे अगत्याचे आहे. सरकारी वकीलांची नियुक्ती यासंदर्भात Cr.Pr.Code चे मूळ कलम २४ पुनर्स्थापित

करण्यात यावे. प्रसिध्दीची लालसा असणारे, बळी पडलेल्या महिलेवरील कलंक अधोरेखीत करतात. तिचे नाव प्रसिध्द करुन नये अशी योजना असताना ही प्रसिध्दी मूळ धोरणाच्या विरुध्दच आहे. महिलांवरील अत्याचारा संबंधातील केसमध्ये सरकारी वकील महिलाच असावी अशी मागणी होत आहे. त्याचाही गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. ॲड्व्होकेट ॲक्ट प्रमाणे वकीलांनी स्वत:ची प्रसिध्दी करणे ही एक प्रकारची जाहिरातच असते. जी गैरकायदेशीर व निषिध्द मानण्यात आली आहे. तो व्यवसायाच्या आचार संहितेचा भंग आहे. स्त्रियांवरील अत्याचाराबद्दलची कोर्ट कारवाई "इन कॅमेरा" करण्यावी यावी, या सर्वांकरता योग्य ते पाऊले उचलली जावी अशी शिफारस समिती करीत आहे.

५) नेटवर्किंग, फेसबुक, मोबाईल फोन व ऑनलाईन वरील अश्लील व अशोभनीय वार्तालाप व फोटोवर बंधन आणावे लागेल. कौमार्यात पाऊल ठेवणाऱ्या मुला-मुलींमध्ये हे प्रमाणे बरेच वाढले आहे असे एका सर्वेक्षणावरुन निदर्शनास आले आहे. यावर बंधने आणणे अगत्याचे आहे. तशी बंधने घालण्याची योजना करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.

६) स्त्रीयांवरील अत्याचाराबाबत जे केवळ बघ्याची भूमिका घेतात, व शक्य असूनही अपराध थांबविण्यासाठी कुठलाही प्रयत्न करीत नाही किंवा पुलिसांना हेल्पलाईनवर किंवा अन्य मार्गांनी कळविण्याची तसदी घेत नाहीत, तेही एका अर्थाने त्यांच्या कर्तव्यांचे पालन करीत नाहीत म्हणजे ते गुन्हेगार आहेत असे मानून त्याबाबत कायद्यात तरतूद करण्यात यावी. कारण एका अर्थाने त्यांच्या मूक संमतीमुळे तो गुन्हा घडत असतो. संविधानाने नागरिकांची जी मूलभूत कर्तव्ये नमूद केली आहेत त्यांत स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा, गोष्टींचा त्याग करणे हे प्रत्येक भारतीय नागरिकांचे कर्तव्य आहे, असे नमूद केले आहे. या भावनेत स्त्रीयांवरील अत्याचार अगर गुन्हे याबाबत बघ्याची भूमिका घेणे व त्याबाबत पुलिसात तक्रार न करणे हाही गुन्हाच आहे. कारण एका अर्थाने ते गुन्हेगारास मदत करणेच आहे. या बाबतीत काही निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ३० नोव्हेंबर २०१२ च्या निकालांत दिले आहेत. याबाबत गांभीर्याने विचार करुन समाजाचे व नागरिकांचे त्याबाबतचे दायित्व याचा कायद्यात उल्लेख करणे अगत्याचे आहे. व तशी सुधारणा कलम ३९ क्रीमिनल प्रोसिजर कोड व कलम १७७ व २०२ इंडीयन पीनल कोड मध्ये करण्याची समिती शिफारस करीत आहे.

७) समितीने यापूर्वी सादर केलेल्या अंतरिम रिपोर्टमध्ये कायद्यासंदर्भात ज्या सुधारणा सुचविल्या आहेत, विशेष करुन कलम ३५४, ५०६ व ५०९ इंडियन पीनल कोड याबाबत

केंद्राकडे डोळे लावून न बसता, राज्याच्या स्तरावर ताबडतोब सुधारणा करण्यात याव्यात. त्याचप्रमाणे अमेरिकेत जसा लपून छपून महिलांचा पाठलाग करुन त्यांना भीति दाखविणे किंवा त्रास देणे हा गुन्हा आहे. तशी तरतूद कलम ५०९ इंडियन पीनल कोड मध्ये करणे आवश्यक आहे. त्यासोबतच 'ब्लॅकमेलींग' करणे, म्हणजे गौप्यस्फोटाची धमकी देऊन पैसे उकळणे, तशी धमकी देऊन सतावणे यासही गुन्हाच मानावा लागेल व तशी तरतूद कायद्यात करावी लागेल. त्याचप्रमाणे कलम २९२, २९३ व २९४ इंडियन पीनल कोड बाबतही सुधारणा सुचवाव्या लागतील व त्याही कलमाचे स्वरुप बदलावे लागेल. याबाबत तामीलनाडू व ओरिसा प्रदेशांनी केलेल्या सुधारणांचा विचार व्हावा, आणि सुश्री शोभाताई फडणवीस यांच्या दिनांक १६ जानेवारी २०१३ च्या पत्रांचाही विचार करण्यात यावा. भारतीय संविधानाच्या कलम ५१(क) अन्वये स्त्रीयांना अपमानित करणाऱ्या सर्व बाबींचा त्याग करणे अगत्याचे आहे. म्हणून महिलांबाबतच्या सर्वच गुन्ह्यांचा त्याच दृष्टीने विचार करावा लागेल, व तशा सुधारणा कायद्यात कराव्या लागतील. तशा सुधारणा करण्याची शिफारस समिती करीत आहे.

८) या संदर्भात श्रीमती मृदुलाबेन साराभाई यांना विचारलेल्या प्रश्नाचे त्यांनी दिलेले उत्तर समर्पक व दिशादर्शक आहे. मृदुलाबेनला कुणीतरी विचारले, की त्या रात्री-बेरात्री काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत कुठेही एकट्या फिरतात. तेव्हा त्यांना बलात्काराची भीति वाटत नाही का? त्यांनी उत्तर दिले, 'बलात्कार नावाचा अपघात होण्याची शक्यता आहे. या भयापोटी भीत भीत जगत मी माझे संपूर्ण स्वातंत्र्य घालवून व गमावून बसू का?' हे उत्तर अतिशय अर्थगर्भीत आहे. स्त्रियांवर होणाऱ्या बलात्कार आदी अत्याचारांकडे याच दृष्टीने बघावे लागेल. तरच स्त्री स्वरक्षित व सुरक्षित राहू शकेल. अशा प्रकारच्या मानसिक तणावांतून आणि अपराधी भावनेतून स्त्री मुक्त झाल्याखेरीज 'स्त्री मुक्ती' संभवतच नाही. स्त्रीची अब्रु हा मनाचा गुण आहे, केवळ शरीराचा नाही. मन शुध्द असेल तर शरीरावरील अपघात अगर जबरदस्तीने अब्रु जात नाही असे मानावे लागेल. स्त्री सुरक्षितच नव्हे तर 'स्वरक्षित' असणे यासाठी आवश्यक आहे. स्त्री मुक्ती पेक्षा 'स्त्री शक्ती' अधिक महत्वाची आहे. ही मानसिकता तयार होण्यासाठी सर्व स्तरावर व शासनाच्या सर्व विभागातर्फे ठोस पाऊले उचलण्यात यावीत, अशी शिफारस समिती करीत आहे.

९) सामाजिक अत्याचारांचे प्रमाणही वाढत चालले आहे. शिक्षण, नोकऱ्या, रोजगार किंवा कमाईसाठी जसजसे स्त्रीचे घराबाहेर पडणे वाढले त्याच प्रमाणात गुन्हेही वाढू लागले आहेत.

पोलीसांच्या द्वारा होणाऱ्या अत्याचारांबाबतही असेच म्हणावे लागेल. कायदे केले तरी पुरुषाची मानसिक वृत्ती बदलली नाही. पोलीस स्टेशनमध्ये होणाऱ्या अत्याचारांसही अधिकाराचा दुरुपयोग व पुरुषी अरेरावी वृत्ती हीच कारणीभूत ठरतात. सामाजिक मनोवृत्तीच अशी आहे. यात बदल घडवून आणण्यासाठी सशक्त पाऊले उचलण्यात यावीत, अशी शिफारस समिती करीत आहे.

१०) याशिवाय व्यसनांचा व्यापार थांबल्याखेरीज स्त्रीयांवरील गुन्हेगारी नष्ट होणार नाही. आज दुर्दैवाने आपल्या देशात दारु, मटका, जुगार, हेरॉईन, गुटका, विडी, सिगरेट इ. अनेक व्यसनांनी जनतेला घेरले आहे. जोपर्यंत पुरुषांची व्यसनांतून मुक्ती होत नाही, तोपर्यंत स्त्रियांवरील सामाजिक अत्याचार संपणार नाहीत, हा प्रश्न केवळ नैतिकतेचा नाही. कारण व्यसनासोबतच स्त्रियांकडे बघण्याची वृत्ती त्यात अंतर्भूत असते. स्त्री - प्रश्नांकडे एकाच दृष्टीने बघण्याची वृत्ती योग्य नव्हे, तिच्या समस्यांचा सर्वांगीण व सर्वंकष विचार व्हावयास हवा. व्यसनाधीनतेमुळे स्त्रियांवरील अत्याचारांच्या संख्येत वाढ होत आहे. याचा विचार गांभीर्याने करावयास हवा. व्यसन - मुक्तीखेरीज स्त्री - मुक्ती अशक्य आहे. व्यसनांमुळे माणुसकीचा ऱ्हास होतो व अभद्र, अश्लील व अशोभनीय गोष्टींना व गुन्ह्यांना प्रोत्साहन मिळत असते. म्हणून व्यसन मुक्तीचा कार्यक्रम सशक्तपणे अंमलात आणण्यात यावा, अशी शिफारस समिती करीत आहे.

११) स्त्रीची 'माणूस' म्हणून प्रतिष्ठा वाढावी म्हणून स्त्रीदेहाचे बीभत्स व अभद्र दर्शन घडविणाऱ्या जाहिरातींवर व प्रकाशनांवर बंधने घालणारा कायदा करण्यात आला. अर्थात पाश्चिमात्य देशात पुरुषाच्याही शरीराचा बीभत्स जाहिरातीसाठी उपयोग करण्यात येतो. आपल्या देशातही याची सुरुवात होत आहे. पाश्चिमात्य देशात अश्लील व अशोभनीय 'पोस्टर्स' विरुध्द चळवळी सुरु करण्यात आल्यात. Women against Pornography या नावाने एक स्त्री-मंच स्थापन करण्यात आला.

जगातील सर्व स्त्रीया या प्रश्नावर एकत्र येऊ शकतात असे या नारी मंचाचे म्हणणे आहे. 'It's one thing women can unite on, because we all get raped and we all get beaten.' त्यांच्या मते, सर्वच स्त्रियांना मार खावा लागतो व बलात्काराच्या भीतिपोटी जगावे लागते. स्त्रीदेहाचे बीभत्स दर्शन घडविणाऱ्या जाहिरातींवर बंधन घालणाऱ्या कायद्याचा, हे थांबविणे हाही एक हेतू असावा. म्हणून त्या संबंधातील कायद्याची सशक्त अंमलबजावणी

करावी व गरज असल्यास त्यात सुधारणा करण्यात यावी, अशी शिफारस ही समिती करीत आहे.

१२) स्त्री विषयक गुन्ह्यात गुंतलेल्यांना राजकीय पक्षांनी उमेदवारी देऊ नये व समाजाने प्रतिष्ठा देऊ नये. त्यांच्यावर बहिष्कार टाकावा. हाच खरा लोकशाही मार्ग आहे. ज्यात 'इनिशिएटिव्ह व इन्फ्यूयन्स' पुढाकार व प्रभाव दोन्ही लोकांचाच असावा लागेल. याबाबतही ठोस पाऊले उचलली जावीत व कायद्यातही तशी सुधारणा करण्यात यावी, अशी शिफारस समिती करीत आहे.

१३) राज्यातील प्रत्येक शाळेत तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात येईल. फास्ट कोर्टाची संख्या वाढविली जाईल. महिलांवरील अत्याचाराच्या केसेस संदर्भात दररोज सुनावणी व्हावी म्हणून प्रयत्न सुरु आहेत असे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केल्याचे वर्तमान पत्रात छापून आले आहे. त्याचे समिती स्वागत करते. त्याबाबत तातडीने पाऊले उचलली जावीत व या आश्वासनांची सशक्तपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस समिती करीत आहे.

१४) याच संदर्भात दिल्ली येथे जलद न्यायालयाचे उद्घाटन करताना भारताचे सरन्यायाधीशांनीही फास्ट कोर्टाची संख्या वाढविली जाईल असे आश्वासन दिले. पण त्याच वेळी हेही स्पष्ट केले की सर्वोच्च न्यायालयाचा 'टेन्टेड' म्हणजे भडक रंगाच्या मोटारीच्या काचांबद्दलच्या निकालाचे पालन करण्याबाबत सशक्त अंमलबजावणी झाली असती, तर कदाचित दिल्लीचे बलात्काराचे प्रकरण टाळता आले असते. त्यांनी असेही आश्वासन दिले की न्यायालय याबाबतीत सामान्य माणसाच्या पाठिशी सशक्तपणे उभे राहील. खरी खंत अशी आहे की, अंमलबजावणी बाबत गांभीर्याने विचारच होत नाही. म्हणून कायद्यांची अंमलबजावणी होते की नाही, ह्यावर लक्ष ठेवण्यासाठी पुलिस विभागांत स्वतंत्र यंत्रणा प्रस्थापित करण्यात यावी अशी शिफारस समिती करीत आहे.

१५) बलात्कारासारख्या गुन्ह्याबाबत अल्पवयीन आरोपीस शिक्षा व्हावी म्हणून त्याबाबतच्या कायद्यात 'ज्युवेनाईल' यांच्या व्याख्यात बदल करण्यात येऊन त्यांतील वयाची मर्यादा १८ वरुन १५ करण्यात यावी. कारण वयस्क कुणाला म्हणावे त्याबाबतच्या कायद्यात १८ वर्षाची मर्यादा आहे. १८ वर्षांनंतर मतदानाचा अधिकारही प्रदान करण्यात आला आहे. बदलती सामाजिक व्यवस्था, चंगळवादी जीवनशैली यामुळे असे करणे अगत्याचे आहे. तशी सुधारणा संबंधित कायद्यांत करण्यात यावी अशी शिफारस ही समिती करीत आहे.

१६) सामान्य माणसाचा पुलिस आणि न्यायालय यांवरील विश्वास कायम राखण्यासाठी पुलिस आणि न्यायाधीश यांची संवेदनशीलता फार महत्वाची आहे. याबद्दल काय करता येईल याचाही गांभीर्याने विचार करावा लागेल. १० डिसेंबर ते १४ डिसेंबर २०१२ रोजी मी स्वत: जयपूर पोलिस अकॅडमीने आय.पी.एस.दर्जाच्या अधिकाऱ्यांसाठी अखिल भारतीय स्तरावर जो 'व्हर्टिकल इन्टर ॲक्शन कोर्स' आयोजित करण्यात आला होता त्याच्या उद्घाटन समारंभाला गेलो होतो. पुलिसांची महिलाबाबतची संवेदनशीलता कशी वाढविता येईल, यासाठी असे ट्रेनिंग कोर्सेस नियमितपणे आयोजित करणे आवश्यक आहे. अशाच प्रकारचे ट्रेनिंग कोर्सेस पोलिस व पब्लीक प्रॉसिक्युटर, सरकारी वकील व जिल्हा न्यायाधीशाच्या स्तरापर्यंतच्या न्यायाधीशांसाठीही आयोजित करणे अगत्याचे आहे. कारण भारताच्या सरन्यायाधीशांनी त्यांच्या भाषणात म्हटल्याप्रमाणे समस्येच्या मूळाशी जाऊन सर्वांगीण विचार करावा लागेल. केवळ कायदे करुन प्रश्न सुटणार नाही. तर कायद्याची संवेदनशील अंमलबजावणी करणाऱ्यांची मानसिकताही बदलणार नाही, तशी योजना आखण्यात यावी अशी शिफारस समिती करीत आहे.

१७) देशात ज्येष्ठ नागरिकांची फार मोठी संख्या आहे. म्हणून या वयस्क नागरिकांनी 'भयमुक्त' समाज प्रस्थापित करण्यासाठी पाऊले उचलावीत, व सामाजिक पालकत्व स्विकारावे. कारण अत्याचार, विनयभंग, बलात्कार यांची सतत भीति वाटत राहील, व आजुबाजूला असलेल्या शेजारच्या लोकांनी सर्व काही मूकपणे पाहायचे, ही भूमिका कशी बदलेल हेच खऱ्या अर्थाने महत्वाचे आहे. गुन्हेगार अशा प्रकारचे गुन्हे करेपर्यंत आपण मूकदर्शक होऊन बसायचे व बघायचे आणि सर्व काही पुलिस व न्यायालय यांनी करायचे ही भूमिकाच असामाजिक आहे. यासाठी लोक जागृति व संरक्षण प्रक्रियेत लोकांचा सहभाग कसा मिळेल यासाठी योजना असाव्या लागतील, तोवर द्रौपदीचे वस्त्रहरण थांबणार नाही. तशा योजना आखण्यात याव्यात अशी शिफारस समिती करीत आहे.

१८) याशिवाय सर्वोच्च न्यायालयाने दि डेप्युटी इन्स्पेक्टर ऑफ जनरल ऑफ पोलीस आणि इतर विरुध्द समुथीराम या केसमध्ये दिनांक ३० नोव्हेंबर २०१२ रोजी दिलेल्या आदेशांचे पालन करणे हे राज्य सरकारचे कर्तव्य आहे. त्या निकालात सर्वोच्च न्यायालयाने खालील आदेश दिले आहेत:

Before undertaking suitable legislation to curb eve-teasing, it is necessary to take at least some urgent measures so that it can be curtailed to some extent. In public interest, we are therefore inclined to give the following directions:-

1) All the State Governments and Union Territories are directed to depute plain clothed female police officers in the precincts of bus-stands and stops, railway stations, metro stations, cinema theatres, shopping malls, parks, beaches, public service vehicles, places of worship etc. so as to monitor and supervise incidents of eve-teasing.
2) There will be a further direction to the State Government and Union Territories to install CCTV in Strategic positions which itself would be a deterrent and if detected, the offender could be caught.
3) Persons in-charge of the educational institutions, places of worship, cinema theatre, railways stations, bus-stands have to take steps as they deem fit to prevents eve-teasing, within their precincts and, on a complaint being made, they must pass on the information to the nearest police station or the Women's Help Centre.
4) Where any incident of eve-teasing is committed in a public service vehicle either by the passengers or the persons in charge of the vehicle, the crew of such vehicle shall, on a complaint made by the aggrieved person, take such vehicle to the nearest police station and give information to the police. Failure to do so should lead to cancellation of the permit to ply.

5) State Governments and Union Territories are directed to establish Women Helpline in various cities and towns, so as to curb eve-teasing within three months.
6) Suitable boards cautioning such act of eve-teasing be exhibited in all public places including precincts of educational institutions, bus stands, railways station, cinema theatres, parties, beaches, public service vehicle, places of worship etc.
7) Responsibility is also on the passersby and on noticing such incident; they should also report the same to the nearest police station or to Women Helpline to save the victims from such crimes.
8) The State Governments and Union Territories of India would take adequate and effective measures by issuing suitable instruction to the concerned authorities including the District Collectors and the District Superintendent of Police so as to take effective and proper measures to curb such incidents of eve-teasing.

अर्थात यातील अनेक बाबी या समितीने यापूर्वी दिलेल्या दीन अंतरिम रिपोर्ट मध्ये अंतर्भूत आहेतच. या सर्व निर्देशांना कायद्याचे रुप देण्यात यावे व तशा सुधारणा कायद्यात करण्यात याव्यात व या निर्देशांची अंमलबजावणी करण्यात यावी अशी शिफारस समिती करीत आहे.

१९) याखेरीज अनेक व्यायामशाळा, आखाडे, जिम्नॅशिअमस् महाराष्ट्रात आहेत. त्यात व्यायामासाठी येणाऱ्या युवकांचा महिला संरक्षणासाठी चांगला उपयोग करुन घेता येऊ शकतो. त्याबाबतही गांभीर्याने विचार व्हावा.

२०) दुर्दैवाने मैदानांची संख्या कमी कमी होत असल्याने सामुहिक खेळातून जी ऊर्जा कामी येत असे, त्याचे प्रमाण आता नगण्य आहे. म्हणून ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त कुसुमाग्रजांनी म्हटल्याप्रमाणे तरुणांची पाऊले अंधाऱ्या बोळांकडे वळत आहेत. हाही शासनाचा व

९८५

(12)

समाजाचाच दोष आहे. म्हणून कुसुमाग्रजांनी पुढे असेही म्हटले आहे की, 'मग कचऱ्याच्या ढिगाऱ्यावरील कागद खाणारे गाढव गीतेचे श्लोक व मटक्याचे नंबर यात भेद करीत नाही.' म्हणून मैदान नसलेल्या शिक्षण संस्थांना शासनाने अनुमती देऊ नये. अशीही शिफारस समिती करीत आहे.

२१) गहिलांवरील अत्याचारास प्रतिबंध घालण्यासाठी काही ठोस पाऊले उचलावी लागतील. अत्याचाराच्या वाढत्या घटना या पार्श्वभूमीवर प्रतिबंधक कारवाई म्हणून महिलांवरील अत्याचाराच्या बाबतीत कोर्टाने ज्यांना दोषी ठरविले आहे त्या व्यक्तीचे नांव व संपूर्ण माहिती एका अधिकृत वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावी. त्याचप्रमाणे ती फेसबूक, ट्वीटर यासारख्या सोशल नेटवर्कींग साईटवरही प्रसिध्द करण्याची व्यवस्था असावी. समाजात जागृती निर्माण करणे आणि अशा गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी प्रतिबंधक पाऊल उचलणे असे दुहेरी उद्दिष्ट यामागे आहे. त्यामुळे तशी योजना करण्यात यावी अशी शिफारस समिती करीत आहे.

२२) निवृत्त पोलीस अधिकारी, निवृत्त सैनिक आणि ज्येष्ठ मंडळी यांची बरीच मोठी संख्या महाराष्ट्रात आहे. त्यांच्या संघटनाही आहेत, व त्या नगरातील वेगवेगळ्या वार्डात विखुरलेल्या आहेत. त्यांनी सामाजिक पालकत्वाची जबाबदारी स्वीकारावी म्हणून काही योजना आखून त्यांना या महिला सुरक्षिततेच्या योजनेमध्ये सामिल करता येईल काय याचा विचार करणे अगत्याचे आहे. व तशी योजना तयार करण्यात यावी. याखेरीज होम गार्डस् व एन.सी.सी. कॅडेटस् चाही उपयोग शांतता व सुव्यवस्था, रस्त्याबाबत नियमांची अंमलबजावणी यासाठी करण्यात यावा. जेणेकरुन पुलिसांवरील ताण कमी होऊ शकेल.

२३) सहकारी सोसायट्योमधील सदस्य व त्यांच्या घरातील तरुण मुलं-मुली यांना प्रबोधन करण्याची सोय व योजना स्वत: या सोसायट्यांनी आखावयास हवी. यातून सोसायट्या या अत्याचारास प्रतिबंध करण्यासाठी काय आवश्यक आहे याची जाणीव तरुण पिढीला करुन देता येईल. म्हणून सोसायटी बाबतच्या बायलॉजमध्ये किंवा सोसायटीला तसे आदेश देऊन आठवड्यातून एकदा त्यांची कम्युनिटी हॉल किंवा एकत्र जमण्याची अन्य जागा असेल तेथे हा प्रयोग करता येण्यासारखा आहे. एकूण असे की, प्रतिबंधक कारवाईच्या संदर्भात संपूर्ण समाजास जोडणे व त्यांना सहभागी करुन घेणे अगत्याचे आहे. याबाबतही पाउले उचलली जावीत अशी शिफारस समिती करीत आहे.

२४) द क्रिमीनल लॉ (अमेंडमेंट) बिल २०१२, जे नुकतेच म्हणजे, ४ डिसेंबर २०१२ रोजी पार्लमेंटमध्ये दाखल करण्यात आले त्याचाही अभ्यास करणे आवश्यक आहे. ते बिलही अपूर्णच आहे. तेव्हा याबाबत महाराष्ट्राने पाऊल उचलून या बिलातील ज्या त्रुटी आहेत त्या दूर करण्यासाठी सूचना करावयास हव्यात. तसेच सर्वोच्च न्यायालयाने जे निर्देश दिनांक ३० नोव्हेंबर २०१२ च्या निकालात दिले आहेत. त्या अनुषंगाने कायद्यातबदल व सुधारणा करण्यात याव्यात.

२५) नुकत्याच एका निकालात सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे, "In spite of stringent legislations in order to curb the deteriorating condition of women across the country, the cases related to bride burning, cruelty, suicide, sexual harassment, rape, suicide by married women etc. have increased and are taking place day by day. A complete overhaul of the system is a must in the form of deterrent punishment for the offenders so that we can effectively deal with the problem." आपली आजची जी फौजदारी न्याय प्रक्रिया आहे त्यात आमूलाग्र परिवर्तन करण्याची गरज आहे. आज न्यायप्रणाली नाही तर निर्णय प्रणाली आहे. यातही सामाजिक गुन्ह्याच्या बाबतीत जी भूमिका स्वीकारण्याची गरज आहे ती स्वीकारली गेलेली नाही. द्विपक्षीय न्यायप्रणाली ही सामाजिक गुन्ह्याच्या बाबतीत स्वीकारणे धोक्याचे आहे. कारण हे गुन्हे व्यक्तिगत नसून संपूर्ण समाजाची शांतता व सुव्यवस्था बिघडवीत असतात. आपण ब्रिटीशांकडून स्वीकारलेली ही न्यायप्रणाली आपल्या देशाच्या परिस्थितीस अनुकूल नाही याची हवी तशी जाणीव आपणास कधी झालीच नाही हे दुर्दैवी आहे. म्हणून त्याही बाबतीत गांभिर्याने विचार करावा लागेल. त्याबाबत अभ्यास करण्यात यावा अशी शिफारस समिती करीत आहे.

२६) महिलांचे आर्थिक व सामाजिक सक्षमीकरण करण्यासाठी ज्या योजना, अगर कायदे आहेत त्यांची अंमलबजावणी सशक्तपणे झाली तर महिलांकडे बघण्याची पुरुषांची व समाजाची मानसिकता बदलण्यास मदत होईल. उदाहरणार्थ घरगुती कामगारांबद्दलची योजना, ज्यात मोलकरणींचाही समावेश आहे, किंवा बचत गट आदि. म्हणून सर्व स्तरावर एकत्रितपणे सर्व प्रकारचे कायदे व योजना यांची अंमलबजावणी होणे अगत्याचे आहे. 'सोशल - डिस ऑर्डर' कायम ठेवून 'लॉ ॲण्ड ऑर्डर' स्थापन होणे शक्य नाही. म्हणून सर्वंकष व सर्वच पातळ्यांवर विचार होणे अत्यंत आवश्यक आहे.

(14)

२७) याखेरीज मुस्लीम महिलांबाबतही गांभीर्याने विचार करावा लागेल. संविधानाच्या कलम ४४ अन्वचे सर्वांसाठी समान नागरी संहिता असणे आवश्यक आहे. त्याबाबतही पाऊले उचलावी लागतील. प्रगतिशील महिलांनी मुस्लीम कायद्याची एक संहिता किंवा कोड असावा अशी मागणी केली आहे. त्यांचे असे स्पष्ट मत आहे की, लग्नाचे वेळी मुलाचे वय २१ असावे, तर मुलीचे वय १८ असावे. त्या वयाखालील लग्न निषिध्द मानले जावे. संसदेने पारित केलेला मेजॉरिटी बाबतचा कायदा 'सेक्युलर' असल्याने सर्वांना लागू व्हावा. वयाबाबत प्रमाणित पुरावा सादर करण्यात यावा. लग्नाला मुलीची संमति स्पष्ट व लेखी स्वरुपात असावी, मेहेरची रक्कम पतीच्या वार्षिक उत्पन्नाच्या शंभर टक्के असावी, आणि जबानी तलाक व इतर स्वरुपाचा 'तलाक'बद्दल काही स्पष्ट योजना असावी. एकतर्फी तलाकही निषिध्द मानण्यात यावा. म्हणून मुस्लीम व इतर धर्मीय महिलांबाबतचे कायदे यांचाही अभ्यास करणे अगत्याचे आहे. कारण त्यांच्यावरील अत्याचारांची तीच कारणे आहेत.

आजवर असा समज होता की, 'हुंडा प्रतिबंधक कायदा' मुस्लीमांना लागू होत नाही, कारण त्या शब्दाच्या व्याख्येत जे स्पष्टीकरण आहे, त्यात ज्यांना 'मुस्लीम पर्सनल लॉ (Shariat)' लागू आहे. त्यांच्या बाबतीत Dower किंवा Maher ह्यांना हा कायदा लागू होणार नाही. परंतु नुकत्याच एका निकालात (Pathan Hussain Basha V. State of AP) सर्वोच्च न्यायालयाने हे स्पष्ट केले आहे. 'हुंडा' जो वधुपक्षाकडून मागितला जातो तो Dower नाही. म्हणून हुंडा मागितला असेल तर मुस्लीमांनाही हुंडा प्रतिबंधक कायदा लागू होतो. एकतर्फी जबानी तलाक बाबतही सर्वोच्च न्यायालयाने मत प्रदर्शित केले आहे. याचाही विचार गांभीर्याने करावा अशी शिफारस समिती करीत आहे.

२८) या संदर्भात असे दिसून आली की शासनाने महाराष्ट्रातील मुस्लीम समाजाची सामाजिक व आर्थिक परिस्थिती आणि कारागृहात असलेल्या मुस्लीम कैद्यांना मिळणारी वागणूक व त्या कैद्यांच्या पुनर्वसनाची गरज याबाबत विचार विनिमय करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती व त्या समितीची बैठक दिनांक ३ नोव्हें.२०१२ रोजी आयोजित करण्यात आली होती व त्या समितीतर्फे काही शिफारशी करण्यात आल्या, त्यांचाही विचार होणे अगत्याचे आहे.

२९) मध्य प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी असे घोषित केले आहे की ज्या व्यक्ती विरुध्द महिलांच्या छेडखानी बाबत तक्रार असेल, त्या व्यक्तीस मोटर ड्रायव्हींगचे लायसन्स किंवा पासपोर्ट देण्यात येऊ नयेत. अशी योजना आखण्यात यावी, अशी शिफारस समिती करीत आहे.

२३१५
15

३०) या खेरीज शासनाने निर्मल ग्राम योजना, आदर्श गांव योजना, घर तिथे शौचालय आदि ज्या योजना जाहिर केल्या आहेत त्यांचीही सशक्त व सर्वंकष अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. नुकत्याच वर्तमानपत्रात ज्या बातम्या प्रसिध्द झाल्यात त्यावरुन हे निदर्शनास आले की, शौचालय नसल्यामुळे महिलांना सूर्योदयापूर्वी किंवा सूर्यास्तानंतर अंधारात शेतात किंवा कुठेतरी कानाकोपऱ्यात शौचाला जावे लागते, व याचा फायदा घेऊन गुन्हेगारी प्रवृत्तीचे पुरुष त्यांचा विनयभंगच नव्हे तर त्यांच्यावर बलात्कारही करतात. आणि अशा घटनांचा कुणी साक्षीदारही नसतो. त्यामुळे मूकपणे महिला हे अत्याचार सहन करतात. म्हणून ही समिती शिफारस करीत आहे की, महिलांसाठी शौचालये व स्वच्छतागृहे मोठ्या प्रमाणावर तातडीने बांधण्यात यावीत.

३१) समितीने यापूर्वी जे दोन अंतरिम रिपोर्ट दिले आहेत त्याबाबत कितपत अंमलबजावणी झाली याबाबतचा अहवाल शासनाच्या सर्व संबंधित विभागाने समितीपुढे सादर करावा अशी विनंती आहे. कायदे झाले व होतीलही पण अंमलबजावणीच झाली नाही तर सगळेच कायदे कागदावरच राहतील अशी भीति वाटते म्हणून संपूर्ण शिफारशींची ताबडतोब अंमलबजावणी व्हावी यासाठी सशक्त अंमलबजावणीची योजना तातडीने आखण्यात यावी अशी शिफारस समिती करीत आहे.

या सर्व शिफारशींचा शासन सहानुभूतीपूर्वक व संवेदनशीलतेने विचार करुन त्यावर ताबडतोब कारवाई करील अशी अपेक्षा आहे.

ऐकूणच महिलांवरील अत्याचाराच्या निराकरणाचा विचार कप्पे करुन करता येणार नाही. शासनाच्या सर्व संबंधित विभागांनी एकत्रितपणे व सर्व शक्तीनिशी काम करणे आवश्यक आहे. तसेच पुलिस, समाज व न्यायालयांची मानसिकता बदलणे व संवेदनशीलता जागवणे अत्यावश्यक आहे, कारण कायदा तोवर आपल्या पायावर उभा राहत नाही, व यशस्वी होत नाही, जोवर त्यास लोकमताचा व सशक्त अंमलबजावणीचा आधार प्राप्त होत नाही. तेच याबाबतचे अंतिम सत्य आहे.

(न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी)
अध्यक्ष
महिलांवरील अत्याचार रोखण्यासंदर्भात
प्रचलित कायद्यातील तरतुदींचा अभ्यास
करण्यासाठी व त्यामध्ये सुधारणा सुचविणारी समिती.

मुंबई,
दिनांक: १६ जानेवारी २०१३

दिनांक १६ जानेवारी २०१३ रोजी समितीच्या बैठकीत सर्वानुमते मंजूर.

(न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी)

(16)

महारा

S.

बाबत "मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्रमांक ८५१३/२०१२ वर दिनांक ३०.११.२०१२ रोजी दिलेला निर्णय"या विषयांचे गृह विभागाचे पत्र क्रमांक :-याचिका-१२१२/प्र.क्र.५५९/विशा-६,दिनांक ६.१२.२०१२ ची व त्यासोबतच्या सहपत्रांची प्रत.)

---

## महाराष्ट्र शासन

तात्काळ

महत्वाचे

क्रमांक : इएसटी - २०१२ / सं.क्र.२१४९/ आस्था-१
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ३० जानेवारी,२०१३

प्रति,
आयुक्त (व्यवसाय प्रशिक्षण)
संचालक (उच्च शिक्षण/ महाविद्यालयीन शिक्षण/व्यवसाय शिक्षण/कला)
कुलसचिव (सर्व अकृषि विद्यापीठे)

त्यांना विनंती करण्यात येते की,त्यांनी सदरचे परीपत्रक त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांच्या निदर्शनास आणावे व मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्रमांक ८५१३/२०१२ वर दिनांक ३०.११.२०१२ रोजी दिलेल्या निर्णयानुसार आवश्यक कार्यवाही करावी.सदर निर्णयातील परीच्छेद ३२ मधील मुद्दा क्र.३ व ६ बाबत शैक्षणिक संस्थांनी विशेष कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास उलट टपाली सादर करावा.

प्रत,
सर्व सह/ उप सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई
यांना सदरचे परिपत्रक माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

(बा.ओं.हेमाडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

निर्गमित
दिनांक 5/2/13

D:\Chaubal-2011\SL Prashthankan\general.doc

(17)

२९४९
१५/१२/१२

महाराष्ट्र शासन
क्रमांक :- याचिका-१२१२/प्र.क्र. ५५९/विशा-६
गृह विभाग,जागतिक व्यापार केंद्र,
सेंटर-१, कफ परेड, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ०६ डिसेंबर २०१२

कार्यासन आस्था-१
दिनांक १२/१२/२०१२
३५५७
१४/१२/२०१२

प्रति,

अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग
अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग
प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग
प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग
प्रधान सचिव, परिवहन विभाग
प्रधान सचिव, नगरविकास विभाग
प्रधान सचिव, कामगार विभाग
प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक (म.अ.प्र.क.), महाराष्ट्र राज्य, पुणे
परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई

विषयः मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपिल क्रमांक ८५१३/ २०१२ वर दिनांक ३०.११.२०१२ रोजी दिलेला निर्णय.

महोदय,

उक्त विषयावरील न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी मा. मंत्री महोदयांना पाठविलेल्या दि. ०१.१२.२०१२ ची प्रत त्या सोबतच्या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि. ३०.११.२०१२ च्या निर्णयाच्या प्रतीसह सोबत माहिती आणि आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठवित आहे.

( सु. ग. सोनवणे )
उप सचिव

उ.व तं. शि. विभाग/ आस्था-१

माहिती करीता सादर.

न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी

विधमान न्यायमूर्ति, उच्च न्यायालय
व मा. मंत्री यांचा दर्जा (महाराष्ट्र शासनाव्दारे प्रदान)
भारताचे मा. राष्ट्रपतिव्दारा पद्मभूषण
ॲवार्डने सन्मानित.
मानद डॉक्टर ऑफ लॉज्

Justice C.S. Dharmadhikari

Conferred Status of Sitting Judge, of High Court
& Hon'ble Minister (By Govt. of Maharashtra)
AWARDED "PADMA BHUSHAN" BY
PRESIDENT OF INDIA.
HON. DOCTOR OF LAWS.

८- ए समता,
जनरल ज. भोसले मार्ग मुंबई ४०० ०२१
फोन नं. २२०४ ४७१६ फॅक्स निवास : २२८३ ४८३२
कार्यालय फॅक्स : २२६७९६९७

8-A, SAMATA, General J. Bhosale Marg,
MUMBAI 400 021.
Tel.No. 2204 4716 Fax No. 22834832 ®
Fax No. 2267 9697 (O)
E-mail: csd1927@indiatimes.com

(16)

श्री मेधा गाडगीळ
माहिती साठी व
उचित कारवाई साठी सादर
1. 12 2012

मुंबई
दिनांक : १ डिसेंबर २०१२.

प्रति,

श्री. आर. आर. पाटीलजी,

PS
1/12/12

यांसी सस्नेह नमस्कार,

काल दि. ३० नोव्हेंबर २०१२ रोजी सर्वोच्च न्यायालयाने, डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पुलिस आणि ईतर विरूध्द एस्. समुथीराम या केसमध्ये महिलावरील छेडखानी थांबविण्यासाठी मार्गदर्शक तत्वे नमूद करून त्यांची अंमलबजावणी तातडीने करावी, असा आदेश केन्द्र सरकार व राज्य सरकारला दिला आहे. त्या निकालाची प्रत सोबत पाठवीत आहे. ही मार्गदर्शक तत्वे का देण्यात येत आहेत. याची समीक्षा निकालच्या परिच्छेद २६ ते ३२ मध्ये नमूद केल्यानंतर परिच्छेद ३२ मध्ये १ ते ८ या परिच्छेदांत सर्वोच्च न्यायालयाने तसे आदेश जारी केले आहेत.

माझ्या अध्यक्षतेखालील समितीनेही अशाच शिफारसी व्दितीय अंतरीम रिपोर्ट मध्ये केल्या आहेत. त्याबाबत शासनाने उच्च न्यायालयांत दाखल केलेल्या शपथ पत्रात असे नमूद केले आहे की, केन्द्र सरकार कायदयात बदल करण्यासाठी पाऊले उचलित आहे. पण ते बिल अपुरे आहे असे नमूद करून सर्वोच्च न्यायालयाने हे आदेश दिले आहेत. अर्थात ते ताबडतोब अंमलात आणणे ही शासनाची जबाबदारी आहे. तशी पाऊले ताबडतोब उचलली जातील अशी अपेक्षा आहे.

कळावे.

आपला सहृदयी

(न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी)

संलग्न : सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाची प्रत.

P.A.
C.R. दाखवा

IN THE SUPREME COURT OF INDIA

CIVIL APPEALLATE JURISDICTION

CIVIL APPEAL NO. 8513 OF 2012

(Arising out of SLP(C) No.31592 of 2008)

The Deputy Inspector General
Of Police & Anr. .....Appellants

Versus

S. Samuthiram ..... Respondent

**J U D G M E N T**

K.S. Radhakrishnan, J

1. Leave granted.

2. Eve-Teasing is a euphemism, a conduct which attracts penal action but it is seen, only in one State, a Statute has been enacted, that is State of Tamil Nadu to contain the same, the consequence of which may at times drastic. Eve-teasing led to the death of a woman in the year 1998 in the State of Tamil Nadu which led the Government bringing an ordinance, namely, the Tami Nadu Prohibition of Eve-Teasing Ordinance, 1998, which later became an Act, namely, the Tamil Nadu Prohibition of Eve-Teasing Act, 1998 [for short 'the Eve-Teasing Act']. The Statement of Objects and Reasons of the Eve-Teasing Act reads as follows:

> "Eve-teasing in public places has been a perennial problem. Recently, incidents of eve-teasing leading to serious injuries to, and even death of a woman have come to the notice of the Government. The Government are of the view that eve-teasing is a menace to society as a whole and has to be eradicated. With this in view, the Government decided to prohibit eve-teasing in the State of Tamil Nadu.
>
> 2. Accordingly, the Tamil Nadu Prohibition of Eve-teasing Ordinance, 1998 (Tamil Nadu Ordinance No. 4 of 1998) was promulgated by the Governor and the same was published in the Tamil Nadu Government Gazette Extraordinary, dated the 30th July, 1998.

4|9

20

3. The Bill seeks to replace the said Ordinance."

3. We are in this case concerned with a situation where a member of the law enforcement agency, a police personnel, himself was caught in the act of eve-teasing of a married woman leading to criminal and disciplinary proceeding, ending in his dismissal from service, the legality of which is the subject matter of this appeal.

4. The respondent herein, while he was on duty at the Armed Reserve, Palayamkottai was deputed for Courtallam season Bandobust duty on 9.7.1999 and he reported for duty on that date at 8.30 PM at the Courtallam Season Police out post. At about 11.00 PM he visited the Tenkasi bus stand in a drunken state and misbehaved and eve-teased a married lady, who was waitingalong with her husband, to board a bus. The respondent approached that lady with a dubious intention and threatened both husband and wife stating that he would book a case against the husband unless the lady accompanied him. Further, he had disclosed his identity as a police man. Both husband and wife got panic and complained to a police man, namely, Head Constable Adiyodi (No.1368) who was standing along with Head Constable Peter (No.1079) of Tenkasi Police Station on the opposite side of the bus-stand. They were on night duty at the bus stand. They rushed to the spot and took the respondent into custody and brought him to Tenkasi Police Station along with the husband and wife. Following that, a complaint No.625/1999 was registered on 10.7.1999 at that Police Station against the respondent under Section 509 of the Indian Penal Code and under Section 4 of the Eve-teasing Act. On 10.7.1999, at about 1.25 hrs., the respondent was taken to the Government Hospital Tenkasi for medical examination. There he was examined by Dr. N. Rajendran, who issued a Certificate of Drunkenness, which reads as follows:

"Symptoms at the time of examination:

Breath smell of alcohol, Eye congested, Retina expanded, sluggish

reaction to light, speech and activities normal, pulse rate 96, Blood

pressure 122/85. I am of opinion that the above person:

(i) consumed alcohol but is not under its influence.

21 24/4

wrong doers are left unpunished even if complaint is filed since there is no effective mechanism to monitor and follow up such acts. The necessity of a proper legislation to curb eve-teasing is of extreme importance, even the Tamil Nadu Legislation has no teeth.

31. Eve teasing today has become pernicious, horrid and disgusting practice. The Indian Journal of Criminology and Criminalistics (January- June 1995 Edn.) has categorized eve teasing into five heads viz. (1) verbal eve teasing; (2) physical eve teasing; (3) psychological harassment; (4) sexual harassment; and (5) harassment through some objects. In Vishaka and Others v. State of Rajasthan; (1977) 6 SCC 241, this Court has laid down certain guidelines on sexual harassments. In Rupan Deol Bajaj and Another v. K.P.S. Gill; (1995) 6 SCC 194, this Court has explained the meaning of 'modesty' in relation to women. More and more girl students, women etc. go to educational institutions, work places etc. and their protection is of extreme importance to a civilized and cultured society. The experiences of women and girl children in over-crowded buses, metros, trains etc. are horrendous and a painful ordeal.

32. The Parliament is currently considering the Protection of Woman against Sexual Harassment at Workplace Bill, 2010, which is intended to protect female workers in most workplaces. Provisions of that Bill are not sufficient to curb eve-teasing. Before undertaking suitable legislation to curb eve-teasing, it is necessary to take at least some urgent measures, so that it can be curtailed to some extent. In public interest, we are therefore inclined to give the following directions:

1) All the State Governments and Union Territories are directed to depute plain clothed female police officers in the precincts of bus-stands and stops, railway stations, metro stations, cinema theatres, shopping malls, parks, beaches, public service vehicles, places of worship etc. so as to monitor and supervise incidents of eve-teasing.

2) There will be a further direction to the State Government and Union Territories to install CCTV in strategic positions which itself would be a deterrent and if detected, the offender could be caught.

3) Persons in-charge of the educational institutions, places of worship, cinema theatres, railway stations, bus-stands have to take steps as they deem fit to prevent eve-teasing, within their precincts and, on a complaint being made, they

22

must pass on the information to the nearest police station or the Women's Help Centre.

4) Where any incident of eve-teasing is committed in a public service vehicle either by the passengers or the persons in charge of the vehicle, the crew of such vehicle shall, on a complaint made by the aggrieved person, take such vehicle to the nearest police station and give information to the police. Failure to do so should lead to cancellation of the permit to ply.

5) State Governments and Union Territories are directed to establish Women' Helpline in various cities and towns, so as to curb eve-teasing within three months.

6) Suitable boards cautioning such act of eve-teasing be exhibited in all public places including precincts of educational institutions, bus stands, railway stations, cinema theatres, parties, beaches, public service vehicles, places of worship etc.

7) Responsibility is also on the passers-by and on noticing such incident, they should also report the same to the nearest police station or to Women Helpline to save the victims from such crimes.

8) The State Governments and Union Territories of India would take adequate and effective measures by issuing suitable instructions to the concerned authorities including the District Collectors and the District Superintendent of Police so as to take effective and proper measures to curb such incidents of eve-teasing.

33. The Appeal is accordingly allowed with the above directions and the judgment of the High Court is set aside. However, there will be no order as to costs.

J.
(K.S. Radhakrishnan)
J.
(Dipak Misra)

New Delhi,
November 30, 2012